## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१२/२०१६

**१) क्षुल्लक कारणावरून दातांनी चावा घेवुन जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ११/१२/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी घनशाम पाडुरंग वाघमारे वय ५० वर्ष रा. खंडाळा यांच्या गाईचे गोऱ्याला आरोपी क्र. ३ ने दगड मारला असता फिर्यादीने तिला हटकले यावरून आरोपी क्र. १ ते ३ यांनी भांडण करून शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ ते २ यानी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारपीट करून आरोपी क्र. २ नी फिर्यादीचे मुलीला उजव्या हाताच्या बोटाला दातानी चावा घेवुन जखमी केल्याने व जिवाने मारण्या—पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,३२३,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**२) ३ विदेशी नागरीक यांनी पैशाची अप्रामाणीकपणे फसवनुक केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १३/१२/२०१६ चे ३६.१३.३० चे रात्र दर. यातील फिर्यादी सतपाल चिमनलाल मदाम वय ५५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड कारधा हे आपले किराणा दुकानात हजर असतांना ३ विदेशी नागरीक (फॉरेनर) हे दुकानात येवुन फिर्यादीस १०० डॉलरची नोट दाखवुन फिर्यादीस भारतीय करंसी नोट बाबद विचारून नोट दाखवीण्यास भाग पाडुन फिर्यादीचे दुकानातील त्याचे हातातील नोटाच्या बंडल मधील २०००/—रू. च्या ६ नोटा व १००/—रू च्या ३८ नोटा असा एकुन १५,८००/—रू अप्रामाणीकपणे फसवनुक करून घेवुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४०६,४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १३/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, कारधा, साकोली, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभट्टी दारू कि. ९५०/—रू. व १ लिटर १७० मिलीलिटर देशी दारू कि. ३२५/—रू तसेच जुगारातुन ३८०/—रू असा एकुन १,६५५/—रू चा माल जप्त करण्यात आला .

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९०४९००३३७२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.